# “महिला सक्षमीकरणातील टप्पे”

## *(भारतातील सामाजिक व राजकीय सुधारकांची महिला सक्षमीकरणातील भुमिका)*

**प्रा. कल्पना राजेश कनके**

**मो. ८८ ०६ ६५ ३७ ३४, ई–मेल : kalpana.kanake@gmail.com**

---

**प्रस्तावना :**

सक्षमीकरण म्हणजे काय? हा प्रश्न प्राथमिक, मुलभूत पण; अत्यंत महत्त्वाचा वाटतो. ‘सक्षमीकरण’ ही बहुआयामी, प्रक्रियात्मक, सृजनशील, प्रवाही संकल्पना आहे. कोणत्याही समाजघटकाला समाजमान्यता, प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समता आणि न्याय मिळवून देण्यासाठी, तसेच, समाजातील विषमता, दारिद्र्य, लिंग, वर्ण, वर्ग, वंश, धर्म इत्यादी प्रकारचे भेद, तसेच, जातीभेदाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जी ‘क्षमता’ त्या अपेक्षित, शोषित समाज घटकात आणावी लागते, ते म्हणजे सक्षमीकरण, असे मला वाटते. मग तो समाज घटक अस्पृश्य, दलित, पीडित, आदिवासी किंवा महिला, कोणीही असो !

कोणत्याही समाजात प्रबोधनाची सुरुवात ही त्या समाजात वावरणाऱ्या संवेदनशील व बुद्धिजीवी समुहाच्या कृती–उक्तीतून होत असते. १५ व्या शतकात युरोपात तर १८ व १९ व्या शतकात भारतात तसेच, महाराष्ट्रात प्रबोधनाचे पडसाद उमटायला प्रारंभ झाला. पाश्चिमात्य उदारमतवादी तत्त्वाचा प्रभाव येथील प्रबोधनावर निश्चितच पडला. समाज हा परिवर्तनशील, संवेदनशील आणि अनुकरणप्रिय असल्यामुळे या परिवर्तनाचे आयाम, प्रश्न, उपाय, भुमिका, निरनिराळे घटक हे देखील बदलण्यास सुरुवात झाली. थोडक्यात, तात्पर्य असे की, भारतीय स्त्रीसुधारणेचा उत्क्रांतीवादी इतिहास हा महिला सक्षमीकरणाचासुध्दा इतिहास राहिला आहे. कोणतीही सुधारणा ही निव्वळ राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक नसते तर त्यात आंतरसंबंध असतात. हाच धागा सक्षमीकरणाला गती देताना समाजसुधारकांनी पकडला आहे.

आज मितीला समाज कितीही विकसित झाल्याचे आपण मानत असलो तरी त्याला साक्ष असणाऱ्या इतिहासाला आपण विसरु शकत नाही. प्रबोधनकाळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक सुधारणांचा संबंध महिला सक्षमीकरण प्रक्रियेशी नक्कीच जोडलेला आहे. मुळातच सक्षमीकरण ही परिवर्तनसापेक्ष प्रक्रिया आहे. कोणतीही सुधारणा ही इतिहासाचाच परिणाम असते, हे आपल्याला विसरुन चालणार नाही. जनजागृतीतूनच समाजप्रबोधन शक्य असते. म्हणूनच राजा राममोहन रॉय, महात्मा जोतिबा फुले, बाबा पद्मनजी, राजर्षी शाहू महाराज, महर्षि धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, ई.व्ही. रामसामी नायकर (पेरियार), न्यायमूर्ती महादेव रानडे अशा अनेक समाजसुधारकांनी निरनिराळ्या समाजप्रबोधनाच्या मार्गाचा अवलंब करुन स्त्री प्रश्नांची मांडणी केली.

**राजा राममोहन रॉय *(इ.स. १७७२ ते १८३३)* :**

बंगालमध्ये समाजसुधारणेच्या माध्यमातून राजा राममोहन रॉय यांनी महिला सक्षमीकरणाला वाचा फोडली. त्यांनी हिंदु धर्मातील अनेक बुरसटलेल्या रुढी, प्रथा, परंपरा, चालिरिती कशा प्रकारे स्त्रियांच्या क्षमतांना निर्बंधित करतात हे दाखवून दिले. तसेच, त्या काळात चालू असलेली सतीची चाल, बहुपत्नित्व, स्त्रियांना धर्माच्या व अंधश्रद्धेच्या नावाखाली तत्कालीन पुरुषसत्ताक प्रतिगामी समाजाकडून मिळणारी क्रूर व हिंसक वागणूक, या व अशा प्रकारच्या

स्त्रियांवर होणाऱ्या अत्त्याचारांविरोधात ब्रिटिश सरकारच्या मदतीने काही महत्त्वपूर्ण कायदे केले. धर्मसुधारणावादी भुमिका हा या महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा राहिला आहे. त्यामुळेच त्या नंतरच्या टप्प्यावरदेखील आपल्याला सत्यशोधक समाजाचा सार्वजनिक सत्यधर्म पहावयास मिळतो.

### विद्यासागर ईश्वरचंद्र *(इ.स. १८२० ते १८९१)* :

बंगालमध्ये स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही हे विद्यासागरांनी पूर्णतः ओळखले होते. त्यासाठी त्यांनी स्त्रियांना मोफत शिक्षण, शिक्षणाचे नवनवे अभ्यासक्रम, धडे, पद्धती यांचा अवलंब केला. ‘सुशिक्षित स्त्री हे समाजाला मिळालेले वरदान आहे,’ असे ते म्हणत. त्याचबरोबर विधवा पुनर्विवाहासंदर्भात त्यांनी ब्रिटीश शासनदरबारी देखील परखड व स्पष्ट भूमिका घेतली. बहुपत्नीत्वाच्या प्रथेलाही त्यांनी कडाडून विरोध केला. सारांश, विद्यासागर ईश्वरचंद्र हे राजा राममोहन रॉय यांच्या कार्याने प्रभावित झालेले सच्चे कर्ते वारस होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

### महात्मा जोतिबा फुले *(इ.स. १८२७ ते १८९०)* :

महाराष्ट्रातील सुसंस्कृत व सुशिक्षित पेशव्यांच्या पुण्यात जोतिराव फुले यांनी आपल्या पत्नीसमवेत उचललेले स्त्री शिक्षणाचे पाऊल फारच महत्त्वपूर्ण ठरले. फुले यांनी आपले संपूर्ण जीवन समाजसुधारणेसाठी समर्पित केले होते. त्यांनी समाजातील अस्पृश्यता, धर्माचे माजवलेले स्तोम, उपेक्षित समाज घटकांवर होणारा अत्याचार व अन्याय, शैक्षणिक विषमता, स्त्रियांवर होणारे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व शारीरिक अत्याचार, इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नांना वाचा फोडली. फुले दांपत्याने स्त्रीशिक्षणला दिलेले महत्त्व लक्षात घेता ‘शिक्षण’ हे प्रत्येक व्यक्तिला सर्वार्थाने ‘सक्षम’, सुशिक्षित व सुसंस्कृत बनवू शकते याचे प्रबोधन पुर्ण विश्वासाने समाजात पसरविले. विद्येचे शस्त्र प्रत्येकाने हाती घ्यावे त्यासाठी पुण्यासारख्या ठिकाणी मुलींसाठी शाळा, दलितांसाठी रात्रीचे शिक्षण वर्ग सुरु केले. प्रस्थापित समाजव्यवस्थेकडून होणारे बालविवाह, विधवांचे केशवपन, स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार, अनौरस संतती या व अशा अनेक स्त्रीप्रश्नांवर फुले यांनी आपले लक्ष केंद्रित केले. त्याला अनुसरुनच त्यांनी समाज व धर्माला त्या विरोधात परखड प्रश्न विचारण्याचे आत्मभान स्त्रियांमध्ये यावे यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना सक्षम बनविण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या त्या अथक् प्रयत्नांमधूनच त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, मुक्ता साळवे यांसारख्या धडाडीच्या महिला सक्षमीकरणाचे उदाहरण म्हणून या टप्प्यावर आपल्याला पुढे येताना दिसतात.

खरे तर फुले दांपत्याचा लढा हा केवळ स्त्रीप्रश्नांपुरता नव्हता तर तो समाजाच्या सक्षमीकरणात अडचणी निर्माण करणाऱ्या समाज घटकांच्या समूळ उच्चाटनाच्या संदर्भात होता. सर्वव्यापी व सर्वस्पर्शी प्रयत्न समाज उभारणीसाठी सर्वांगाने कसा आवश्यक असतो हे फुले यांनी दाखवून दिल्याचे दिसते. सारांश, महात्मा फुले यांच्या बाबतीत असे म्हणताा येईल की, कोणत्याही समाजात समता प्रस्थापित करावयाची असेल तर सामाजिक न्याय प्रस्थापित करावा लागतो. कारण सक्षम समाज घटकच न्यायाची मागणी व समतेचा उपभोग घेऊ शकतो. त्यामुळेच

समाजाच्या पुर्नरचनेचे सूत्र म्हणुन, शिक्षण + समता + न्याय = सक्षमीकरण असे म्हणता येईल. हे त्रैसूत्री समीकरणच स्त्री सक्षमीकरणासाठी तद्‌नंतरच्या काळातही लागू राहिले.

### न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे *(इ.स. १८४२ ते १९०१)* :

न्यायमूर्ती महादेव रानडे यांनी बालविवाह, स्त्रियांना कुटुंबातील मालमत्तेचा हक्क, स्त्री शिक्षण इत्यादी प्रश्नांवर आपली परखड मते मांडली. त्यांच्या मते सामाजिक, लोकशाही व आधुनिकीकरणाची पायाभरणी झाल्याखेरीज व्यक्ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकणार नाही, मग ती स्त्री असो वा अन्य कोणीही !

### महर्षी धोंडो केशव कर्वे *(इ.स. १८५८ ते १९६२)* :

स्त्री शिक्षणाचे अग्रणी, विधवा पुर्नविवाहाचे कृतीशील पुरस्कर्ते, मानवीसमतेचे आग्रही, राष्ट्र उभारणीत स्त्रीशक्तीच्या सहभागाची आवश्यकता अधोरेखित करणारे, तसेच, बहुजन व उपेक्षित घटकाला स्वतंत्र व स्वावलंबी बनविण्यासाठी स्त्री शिक्षणाबाबत आग्रही, ठाम व निश्चयी भूमिका मांडणारे महर्षि कर्वे हे न्यायमूर्ती महादेव रानडे यांची स्त्री शिक्षणाची विचारधारा पुढे घेऊन जाणाऱ्यांपैकी एक कट्टर समर्थक व कृतीशील अनुयायी म्हणून सर्वपरिचित आहेत. समाजातील ‘स्त्री’ हा घटक या काळात पूर्णतः दुर्लक्षित व उपेक्षीत होता. त्या समाजातील स्त्री शक्तीला सामर्थ्यपणे घडविण्याचे महत्वपूर्ण कार्य कर्वे यांनी केले. वैविध्यपूर्ण स्त्री शिक्षण संस्था, विधवा विवाहोत्तेजक मंडळी, महिला विद्यापीठ, अनाथ बालिकाश्रम, समता संघ, निष्काम कर्ममठ इत्यादी संस्थात्मक कार्याद्धारा स्त्रियांना सक्षम व सबल बनण्यासाठी महर्षी कर्वे यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत प्रयत्न केले. थोडक्यात, शिक्षण + स्वावलंबन + समता = सक्षम समाज (न्यायपूर्ण समाज) हे महर्षी कर्वे यांच्या ‘स्त्री सक्षमीकरणा’ चे प्रमुख सूत्र होते असे म्हणता येईल.

### पंडिता रमाबाई रानडे *(इ.स. १८६२ ते १९२४)* :

सावित्रीबाई फुले यांचा वसा यशस्वीपणे पुढे नेताना स्वतःपासूनच शिक्षणाला सुरुवात करुन स्त्री शिक्षणासाठी ‘सेवा सदन’, ‘हिंदू सोशल अँड लिटररी क्लब’ यांसारख्या सामाजिक व शैक्षणिक संस्था स्थापन करण्यापर्यंतचा प्रवास हा नक्कीच स्त्री सक्षमीकरणाला अधोरेखित करतो. स्वतःच बालविवाहाची शिकार ठरलेल्या रमाबाईं पती महादेव रानडे यांच्या निधनानंतर समाजातील कुप्रथांविरोधी वेगवेगळ्या व्यासपीठांवरुन कणखर भूमिका घेऊ लागल्या. स्त्री गुन्हेगारांचे पुर्नवसन व बाल गुन्हेगारांना समुपदेशन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले.

### सयाजीराव गायकवाड *(इ.स. १८६३ ते १९२४)* :

बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी मिश्रविवाह, विधवा विवाह, स्त्री–वारसा, कन्या विक्रय बंदी, बालविवाह बंदी, पडदा पद्धती बंदी इत्यादींविरोधात सुधारणा करुन आपल्या बडोदा संस्थानात त्यांची अंमलबजावणी करुन त्या बंद करण्यासाठी प्रयत्न केले. सत्ता आणि अधिकार असले की समाजाला सक्षमतेच्या दिशेने नेता येते, याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज हे होत. त्याचबरोबर शिंदे विठ्ठल रामजी यांनीसुद्धा देवदासी व मुरळ्या वाहण्याच्या चालीचा प्रतिबंध केला. त्यांनी मुलींना सक्तीचे मोफत शिक्षण,

दारुबंदी, स्त्रियांनी 'चुल व मुल' या परिघातून बाहेर पडण्यासाठी पुण्यात १९२४ साली 'कौटुंबिक उपासना मंडळ' सुरु केले.

### नायकर ई.व्ही. रामस्वामी (पेरियार) *(इ.स. १८७९ ते १९७३)* :

द्रवीड अंदोलनाचे प्रमुख नेते, थोर तामिळ समाजसुधारक व तामिळ जनतेत 'पेरियार' म्हणजे थोर आत्मा व 'थानमाई' (पिता) म्हणून रामस्वामी नायकर प्रसिद्ध होते. तामिळनाडूतील ब्राह्मणेतर चळवळीचे अग्रणी, तसेच, महिलांच्या प्रश्नांवर परखड भूमिका घेणारे ते कर्ते सुधारक होते. वर्ण व्यवस्था, देवदासी पद्धती, बालविवाह, सक्तीचे वैधव्य, हुंडा पद्धती, अंधश्रद्धा निर्मुलन, जाती व्यवस्था, इत्यादींवर आयुष्यभर त्यांनी ताशेरे ओढले. तामिळनाडूतील स्त्रियांमध्ये आत्मभान निर्माण करण्यात; तसेच लष्कर शासनामध्ये ५० टक्के स्त्री सहभाग नोंदविण्यात नायकर यांची भूमिका अत्यंत मोलाची व महत्त्वाची ठरते. स्वाभिमान चळवळीच्या माध्यमातून विवाह संस्थेत तसेच कुटुंब व्यवस्थेत क्रांतीकारी बदल घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. स्त्रियांनी केवळ 'चुल व मुल' या कक्षेत अडकून न पडता, जगातील अवकाशात आपले आस्तित्व सिद्ध करावे यासाठी ते प्रयत्नशील होते.

### रघुनाथ धोंडो कर्वे *(इ.स. १८८२ ते १९५३)* :

महर्षी कर्वे यांचे चिरंजीव रघुनाथ धोंडो कर्वे यांनी एका वेगळ्या स्त्री प्रश्नावर खंबीरपणे आपली भूमिका मांडली. जो की आज अनेक स्त्री चळवळींचा प्रमुख मुद्दा आहे. स्त्रीची लैंगीकता, योनीशुचित ही धर्म, समाज नियंत्रित असते. त्यामध्ये संतती नियमनाच्या निश्चितीचा अधिकार केवळ पुरुषांनाच आहे. या विरोधात समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे काम रघुनाथ कर्वे यांनी केले. संततिप्रतिबंधक व लैंगीक रोग प्रतिबंधक समस्यांवर क्रांतीकारी कार्य त्यांनी केले. यातूनच स्त्रियांनी शारीरिकदृष्ट्या सक्षम व सुदृढ असणं त्याचबरोबर स्त्रियांनी सक्षम, सुदृढ व निरोगी पिढी निर्माण करणं या बद्दलचा अधिकार स्वतःकडे राखून ठेवणं हे अपेक्षित होते. स्त्री ही केवळ पुर्ननिर्मितीचे साधन नसून ती एक जिवंत व स्वतंत्र व्यक्तीमत्व आहे, हे समाजाने मान्य केले तरच तिला सक्षम होता येईल असा त्यांचा विश्वास होता.

### डॉ. भीमराव रामजी आंबेडकर *(इ.स. १८९१ ते १९५६)* :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वेगवेगळ्या चर्चा, परिषदा, मेळावे, पत्रके इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे भारतीय समाज व्यवस्थेतील जात, वर्ण, धर्माची मुळ किती खोलवर रुजली आहेत, यांबाबत आपली भूमिका मांडत असत. प्रस्थापित वर्गाने अनेक जाचक रुढी, प्रथापरंपरा, चालिरिती निर्माण केल्या आहेत. त्याचाच परिणाम म्हणून येथील दलित, आदिवासी, महिला इत्यादी उपेक्षित घटकांना त्यांचे अस्तित्व व स्वातंत्र्य अबाधित ठेवता येत नाही. त्यामुळे 'शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा ईशाराही बाबासाहेबांनी समाजाला दिला. महिलांच्या राहणीमानाबद्दल ते म्हणत की, इतर महिलांप्रमाणे दलित महिलांनी देखील पुर्ण वस्त्रे परिधान करावीत. तसेच, महिलांनी सक्षमतेसाठी शिक्षण व रोजगाराच्या क्षेत्रात पुढाकार घ्यावा. एवढेच नव्हे तर, पारंपारिक रुढी, प्रथा व परंपरांना झुगारुन द्यावे. दलित महिलांच्या सक्षमीकरणामध्ये बाबासाहेबांचे योगदान अतिशय मोलाचे वाटते. त्यांनी स्त्रियांना 'हिंदू कोड बीला'द्वारे अवकाश मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

महात्मा गांधींनी स्त्रियांना राष्ट्रीय चळवळीत सहभागास प्रवृत्त केले आणि त्यातूनच स्त्रियांमध्ये संघटनवृत्ती निर्माण झाली. परंतु स्त्रियांची ही संघटनवृत्ती केवळ राष्ट्रीय चळवळीचाच एक भाग ठरली.

वरील स्त्री सक्षमीकरणाचा इतिहास हा जरी पुरुषी असला तरी स्त्रियांच्या सहभागातूनच स्त्री प्रश्नांची मांडणी व उकल करणारा असल्याचे आपल्याला दिसते. इतिहासापासून ते आतापर्यंत महिला सक्षमीकरणायाचे आयाम हे सतत बदललेले दिसतात. कारण 'स्त्रिया' हा घटकच मुळात एकसाची नाही. येथील बहुविविधतेत स्त्रियांची 'बहुविविधता' समाविष्ट आहे. तेव्हा सक्षमीकरणाचे मोजमाप एकसंधपणे करता येणे अशक्य आहे. येथे आदिवासी, दलित महिलांच्या सक्षमीकरणाची स्थिती पाहता उच्चभ्रु व उच्चशिक्षित महिलांच्या तुलनेत नक्कीच कमी आहे. तेव्हा ही सर्वार्थीची बहुजिन्नसता ही महिला सक्षमीकरणाला न्याय कशी मिळवून देऊ शकेल?

महिला सक्षमीकरणाच्या पहिल्या टप्प्यावर (इ.स. १८४८ ते इ.स. १९२०) प्रस्थापित ब्राह्मणी व्यवस्थेने जातींच्या कक्षा अधिकाधिक नियंत्रित करताना स्त्रियांच्या संदर्भातील अनेक जाचक प्रथा जसे, सक्तीचे वैधव्य, बालविवाह, सती, विधवा केशवपन, विधवा पुर्नविवाह बंदी इत्यादी विरोधात अनेक समाजसुधारकांनी महत्त्वाच्या भूमिका बजावल्या. हा संपूर्ण काळ ब्रिटिश सम्राज्याचा होता. तेव्हा भारतीय स्त्रियांच्या सक्षमीकरणाला भारतीय पुरुषसत्ताक समाजव्यवस्थे बरोबरच परकीय सत्तेची चौकट ही मर्यादित करीत होती.

दुसऱ्या टप्प्यात (इ.स. १९२० ते इ.स. १९५०) परकीय सत्ता ही उदारमतवादाचे व व्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन करणारी होती. त्याचबरोबर येथील सुशिक्षित व बुद्धिजीवी समाजसुधारकांच्या भूमिकांना वावा देणारी होती. म्हणुनच स्त्री प्रश्नांच्या अनुषंगाने सती प्रथा बंदी, विधवा पुर्नविवाह, बाल विवाह बंदी, वारसा हक्क, इत्यादी बाबतीत सुधारणा घडवून आणणारे कायदे केले गेले. परंतु या कायद्यातही पुरुषसत्तेच्या सर्व चौकटी अबाधित ठेवल्या गेल्या होत्या.

तिसऱ्या टप्प्यावर (इ.स. १९५० ते इ.स. १९७५) औद्यागिक क्रांतीनंतर जन्माधिष्ठित विषमता नष्ट करण्यास मदत झाली. स्त्रियांमधील कर्तृत्वशक्तीला वाव मिळत गेला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत स्त्रियांचा सहभाग होता. मोठ्या प्रमाणत स्त्रिया नोकऱ्या करु लागल्या. त्यांच्याशी संबंधित महागाई, जल-जंगल-जमीन, आरोग्य, स्वच्छता, सहभाग इत्यादी प्रश्नांवरील आंदोलनात, संप, बंद, मोर्चे, मेळावे, उपोषणे, चळवळी, संघटनात स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण वाढले. त्यानंतर १९७५ हे वर्ष युनोने महिला वर्ष म्हणुन घोषित केल्यामुळे स्त्री प्रश्न ऐरणीवर आला. १९७४ च्या समानतेच्या दिशेने या अहवालानंतर शासनाने पुढाकार घेऊन महिला सक्षमीकरणाच्या धोरणाची घोषणा केली. १९७५ नंतरच, खऱ्या अर्थाने, स्वतंत्रपणे महिला सक्षमीकरणावर भाष्य करायला सुरुवात झाली. आजपर्यंत इतिहासाचा आपण आढावा घेतला तर, 'स्त्री' ही राष्ट्र उभारणीच्या चळवळीचा अविभाज्य घटक, समाजसुधारणेचा घटक, धर्मसुधारणेचा घटक, कुटुंब सुधारणेचा घटक अशीच तिची ओळख राहिली. परंतु, आधुनिकीकरणाच्या टप्प्यावर मात्र तिने कात टाकली. स्वतःची स्वतंत्र ओळख सक्षमपणे निर्माण करण्याचे बळ येथील विविध स्त्री चळवळींनी, संघटनांनी तिला दिले. पितृसत्ताक समाजव्यवस्थेतून, स्त्रीवादी आंदोलनापर्यंतचा प्रवास हा अत्यंत खडतर राहिला आहे.

१९७५ नंतर स्त्रियांचा टक्का सर्व क्षेत्रात वाढलेला दिसतो. १९९० नंतर तर जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या प्रवाहात स्त्री प्रश्नांचे स्वरुप अधिकाधिक जटिल होत गेले.

त्यामुळे स्त्री प्रश्नांचे NGOकरण होत गेले. एका अर्थाने, याचा चांगला परिणाम असा झाली की, स्त्रीचं स्वायत्त, जागृत अस्तित्व समाजमान्य होत गेले. पारंपारिक व्रतवैकल्य, थोतांड प्रथापरंपरा, गौरवीकरणाच्या चौकटीतून स्त्रीला बाहेर पडण्यासाठी अवकाश प्राप्त झाला. जागतिकीकरणामुळे भांडवलशाहीच्या विकासाला चालना मिळाली. पारंपारिक पुरुषप्रधानतेचा प्रभाव काही अंशी ओसरला तरी नव्या 'बॉस' पुरुषीप्रधानाच्या कडा स्त्रियांना असुरक्षिताच प्रदान करताना दिसतात (तेजपाल प्रकरण). अधिकाधिक असुरक्षित अशा असंघटित क्षेत्रात स्त्रिया आज फेकल्या जात आहेत. गरिबी, स्त्री-पुरुष प्रमाणातील वाढती तफावत, वंचितता, यांमुळे वर्गीय, जातीय आणि लैंगीक हिंसाचार सध्या आपल्याला वाढलेला दिसतो. (स्त्रीभ्रुणहत्त्या, निर्भया प्रकरण, शक्ती मिल बलात्कार प्रकरण, ऑनर किलिंग, खैरलांजी प्रकरण इत्यादी.)

१९७५ पूर्वीच्या महिला सक्षमीकरणाचा इतिहास पाहता, किमान महिला या कोटिक्रमात फक्त उच्च जातीय, कनिष्ठ जातीय व आदिवासी असे ढोबळ मानाने वर्गीकरण करता येईल. त्यासाठी झालेले सक्षमीकरणाचे प्रयत्न मग ते कायद्यांच्या, धोरणांच्या वा योजनांच्या चौकटीत असतील किंवा संघटना, NGO, राजकीय पक्ष इत्यादींच्या स्तरावरील असतील. परंतु १९९० नंतर जर महिला सक्षमीकरणावर दृष्टिक्षेप टाकला तर 'महिला' हा 'कमाल ओळखी' असणारा समाज घटक बनला आहे. म्हणजे *प्रत्येक व्यक्तीच्या अनेक ओळखी असतात.* याप्रमाणे महिलेचे व्यक्ती असणं समाजमान्य झालं. परंतु त्याच बरोबर त्या विशिष्ट जात, वर्ग, वंश, वर्ण, धर्म, कार्यक्षेत्र, पक्ष, संघटना, NGO, इत्यादींबरोबर जोडल्या जाताना दिसतात. तेव्हा 'एका व्यक्ती घटकाची अनेकांशी ओळख' हा महिला सक्षमीकरणातील मोठा अडथळा ठरु शकतो. कारण तिला कुठल्याही एका धोरणाचा फायदा घेताना दुसऱ्या 'ओळखी' अडसर ठरु शकतात. उदा. आदिवासी महिलांचे संघटन तितकेसे प्रभावी नाही. तेव्हा त्यांची संघटनात्मक ओळख नाही. धर्म, कार्यक्षेत्राची ओळख नाही म्हणून ती डावलली जाते. मग तिच्या सक्षमीकरणाच्या मर्यादा या वाढत जातात.

आज संख्याशास्त्राच्या प्रभावी वापरातून महिला सक्षमीकरण टक्क्यातून पुढे आणले गेले. तरी वास्तविकता अधिक विदारक आहे. शासन आणि महिला सक्षमीकरण यांचा परस्पर संबंध हा आजही दृढ राहिला आहे. सर्वप्रथम विद्यापीठीय पातळीवर 'स्त्री' अभ्यासाच्या ज्ञानशाखा उदयाला आल्या. मथुरा बलात्कार प्रकरणानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला मान्य करत बलात्काराच्या कायद्याचे पुर्नविलोकन केले. त्यानंतरही, खैरलांजी, शक्ती मिल, निर्भया प्रकरण घडलेच ! आणि पुन्हा पुर्नविलोकन करावे लागले. हुंडाबळी व घरगुती हिंसा या संदर्भात १९७८ व १९८६ मध्ये आणि त्या नंतर २००६ मध्ये कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा आला. शहाबानो पोटगी प्रकरणात तर मुस्लिम महिलांच्या जगण्याच्या प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय कायद्यात रुपांतरित होताना राजकीय नेत्यांनी घेतलेल्या कडव्या भूमिका लक्षात घ्याव्या लागतात.

राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नाने 'सती प्रथा बंदी'चा कायदा झाला. परंतु १९८७ चे रुपकंवर प्रकरण लक्षात घेता परंपराग्रस्त समाज कायद्याची कशी पायमल्ली करतो हे लक्षात येते. १९९४ च्या ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्त्रियांना सार्वजनिक अवकाशाबरोबरच राजकीय अवकाश सक्षमतेसाठी उपलब्ध करुन दिले.

आतापर्यंतच्या महिला चळवळी व आंदोलनाचा सूर हा आर्थिक, सामाजिक सक्षमीकरणाचा राहिला. परंतु राजकीय अधिकारांशिवाय सामाजिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम होता येत नाही हेच यातून दिसून येते. स्त्रियांचे प्रत्यक्ष सक्रिय राजकारणात प्रवेश करणे याचे प्रमाण आज मितीस कितीसे आहे? आज स्थानिक स्वराज संस्थांमधील ५० टक्के स्त्रियांना आरक्षण देऊनही किती टक्के महिला मिळालेल्या राजकीय सत्ता, अधिकाराचा वापर, स्वतःच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी करत आहेत? हा प्रश्नच आहे. शासनाने वेळोवेळी महिलांच्या प्रश्नांसंदर्भात कायदे केले, धोरणे अवलंबिली, विविध योजना लागू केल्या. यामधून किती प्रमाणात महिलांचे सक्षमीकरण झाले हे जर पहायचे असेल तर मानवविकास निर्देशंकावर एक नजर टाकलीच पाहिजे.

भारताचा जगात १३६ वा क्रमांक लागतो. महिला समाजव्यवस्थेचा अविभाज्य व अनिवार्य घटक आहे, हे नुसते ऐकायलाच मिळते. तेव्हा या घटकाला सर्वार्थाने प्रत्यक्ष सक्षम करणे हे समाज, शासन व स्वतः महिला यांचे प्रथम कर्तव्य आहे.

वेळोवेळी बदलत गेलेल्या समाजव्यवस्थेच्या गरजा, उपलब्ध संसाधने, तंत्रविज्ञान इत्यादी बाबी लक्षात घेता 'महिला सक्षमीकरण' ही व्यापक प्रक्रिया असल्याचे आपल्या लक्षात येते. काळाच्या ओघात यामध्ये बदल होत जातो. त्याचे काही चांगले तर काही वाईट, दृश्य व अदृश्य परिणामही समाजावर उमटतात. महिला अगोदर जात व धर्म व्यवस्थेशी जोडल्या जात परंतु नंतर कुटुंब व समाजाशी जोडल्या गेल्या. औद्योगिक क्रांती नंतर सार्वजनिक क्षेत्रात महिला कामगार म्हणून 'कार्यक्षेत्रा'शी जोडल्या गेल्या. १९७५ नंतर स्वतःचे प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नात संघटनात्मक पातळीवर स्वतंत्रपणे भूमिका घ्यायला सुरुवात झाली. १९९० नंतर सर्वच क्षेत्रात महिलांचा उणापुरा वावर दिसू लागला. शासनाने केलेल्या वेगवेगळ्या कायद्यांच्या आधारे महिलेला तिच्या क्षमतेनुसार सक्षम बनविण्याच्या संधी बचत गटांसारख्या वेगवेगळ्या माध्यमांद्वारे उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न झाले. शेवटी, सक्षमीकरण मग ते कोणत्याही स्तरावरचे असो, ते विकासाकडेच नेणारे असते आणि विकास ही कधीही न थांबणारी गतीशील प्रक्रिया आहे. त्यामुळे सक्षमीकरण ही देखील अखंड, प्रवाही, गतीशील अशी प्रक्रिया आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) संपादक : स.मा. गर्गे
"भारतीय समाजविज्ञान कोश" – खंड, १, २, ३, ४ आणि ५.
प्रकाशन – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२) संपादक : भास्कर लक्ष्मण भोळे
"विचारवेध संमेलन अध्यक्षीय भाषणे" – खंड २
अ) "भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते आयाम", डॉ. छाया दातार, पृ. २२१
प्रकाशन : सुगावा, पुणे, प्रथमावृत्ती – मे २००८.

३) संपादक : शरद जावडेकर, वसुधा जोशी, लता जाधव, रविंद्र म्हसदे.
"सामाजिक परिवर्तन : चिकित्सा आणि भवितव्य", (भा.शं. भणगे गौरव ग्रंथ),
प्रकाशन – सुगावा, प्रथमावृत्ती – जानेवारी २००१.

अ)  "स्त्री चळवळ : काल, आज आणि उद्या", गीताली वि.मं., पृ. २००.
ब)  "भारतीय प्रबोधन : स्वरुप आणि आव्हाने", भास्कर लक्ष्मण भोळे, पृ.४७.
क)  "नवे प्रबोधन : अर्थ व आशय", अशोक चौसाळकर, पृ. ५१.

४)  विद्युत भागवत – "स्त्री प्रश्नांची वाटचाल", विभाग ३,
अ)  "भारतीय स्त्रिया आणि स्त्रीवादी चळवळीचे भिन्न अविष्कार".
ब)  "स्त्रीवाढी चळवळ आणि भारतीय स्त्रियांचे प्रश्न", पृ. १९१–२११, प्रथमावृत्ती, ८ मार्च २००४, प्रकाशन – प्रतिमा, पुणे.

५)  मेधा नानिवडेकर – "महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा (१९७५) पासून", प्रकाशक – प्रतिमा, पुणे, स्त्री अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १ जानेवारी, २००६.

. . . . .